महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
CIN: U40109MH2005SGC153645

मुख्य महाव्यवस्थापक कार्यालय (प्र व सु)
प्रशिक्षण व सुव्यवस्था, म.रा.वि.वि.कं.म.,
चेमरी नं. १, एनटीपीएस कॉलनी, एकलहरे,
नाशिक (महाराष्ट्र) - ४२२ १०५

ISO 9001:2008
दुरध्वनी क्र. ०२५३- २८१००४६
ई मेल : amhrexam@gmail.com

जा.क्र. मुमव्य/प्रवसु/एकलहरे/नाशिक/ № 2604 दिनांक : 23 DEC 2016

## परिपत्रक

**विषय:** सरळसेवेने नियुक्त केलेल्या लेखा सहाय्यकांना उच्चस्तर लिपिक (लेखा) या पदावर सामावुन घेतल्यानंतर निम्नस्तर लेखा परीक्षा उत्तीर्ण न करता उच्चस्तर लेखा परीक्षेस बसण्यासाठी परवानगी देणेबाबत.

**संदर्भ:** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४४ दिनांक १६.०१.२०१३.
२) या कार्यालयाची कार्यालयीन टिप्पणी मुमव्य/प्रवसु/एकलहरे/नाशिक/१६९ दि. ०८/११/२०१६.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार खातेनिहाय परीक्षा ह्या त्याच विभागातील विविध पदांच्या पदोन्नतीसाठी घेतल्या जातात. **उदा. लेखा व मानव संसाधन (सामान्य प्रशासन विभाग).** सर्वसामान्य स्थायी आदेश क्र. ११० दिनांक २५.०१.१९६२ मधील तरतुदीनुसार कंपनीच्या सेवेत सरळसेवेने नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना कंपनीच्या सेवेत एक वर्ष पूर्ण केल्याखेरीज ते निम्नस्तर / उच्चस्तर परीक्षेस बसण्यास पात्र ठरत नाहीत.

प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४४ दिनांक १६.०१.२०१३ २(अ) व २(ब) नुसार मानव संसाधन व लेखा विभागातील पदव्युत्तर पदवी धारक कर्मचाऱ्यांना निम्नस्तर सामान्य प्रशासन परीक्षा व निम्नस्तर लेखा परीक्षेस बसण्यापासून सुट देण्याची तरतूद आहे. परंतु कंपनीच्या सेवेत सरळसेवेने उच्चस्तर लिपिक (लेखा) नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या समावेशन आदेशात ते पदव्युत्तर पदवी धारक असुनही त्यांना निम्नस्तर लेखा परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे, अशी अट त्यांच्या समावेशन आदेशात आहे.

या कार्यालयाने वरील मुद्यांबाबत प्रस्ताव सक्षम अधिकारी यांच्याकडे मंजुरी / मार्गदर्शन करीता सादर केला होता. संदर्भ क्र. २ नुसार सक्षम अधिकारी यांनी खालीलप्रमाणे मंजुरी दिली आहे.

**''पदव्युत्तर पदवी धारक कर्मचाऱ्यांना प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४४ दिनांक १६.०१.२०१३ २(अ) व २(ब) नुसार निम्नस्तर परीक्षेस बसण्यापासून सुट द्यावी.''**

**सबब, प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४४ दिनांक १६.०१.२०१३ २(अ) व २(ब) नुसार मानव संसाधन व लेखा विभागातील पदव्युत्तर पदवी धारक कर्मचाऱ्यांना निम्नस्तर सामान्य प्रशासन परीक्षा / निम्नस्तर लेखा परीक्षेस बसण्यापासून संबंधीत मंडळ कार्यालय स्तरावर सुट मंजुर करण्यात यावी.**

**(रंजना पगारे)**
**मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु)**
**एकलहरे नाशिक**

**प्रति,**
**प्रेषण यादीप्रमाणे सर्व स्तरावर.........**